शासकिय नर्सिंग स्कुल बाभळगांव येथील आवश्यक बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१७/ प्र.क्र.२७/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: २० डिसेंबर, २०१७.

वाचा

1) **संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/शुश्रुषा/कक्ष-९/टे-१/ जिरुलातूर/प्रशासकियमान्यता/२०३१-३३/१७, दि.१६.०६.२०१७.**

प्रस्तावना

संदर्भाधीन पत्रान्वये शासकिय नर्सिंग स्कूल बाभळगांव येथील वस्तीगृह व नर्सिंग स्कूल परिसरात ६० मी. मी. जाडीचे Power Block बसविणे, वस्तीगृह व नर्सिंग स्कुल परिसरात एंगलच्या साह्याने शेड तयार करुन त्यावर फायबर पत्र्याचे काम करणे, नर्सिंग स्कुलच्या ओपन टू स्काय जागेवर ८ मी. मी. जागेचे पॉलीकारबोनेट Multi Wall डोमचे काम करणे, वस्तीगृह व नर्सिंग स्कुल इमारतीस जोत्याचे संरक्षण कामाअतंर्गत वीटकाम करणे, गिलावा करणे व एम. १० मध्ये आतील बाजूस कॉर्क्रीट करणे याबाबतचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे दि.१६.६.२०१७ चे पत्रान्वये रु.११.६४ लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक व आराखडे प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केले आहेत. सदर कामाचे सन २०१५-१६ च्या दरसूचीवर आधारीत सविस्तर अंदाजपत्रक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, लातूर यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, लातूर यांनी साक्षांकित केले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

शासकिय नर्सिंग स्कूल बाभळगांव येथील वस्तीगृह व नर्सिंग स्कूल परिसरात ६० मी. मी. जाडीचे Power Block बसविणे, वस्तीगृह व नर्सिंग स्कुल परिसरात एंगलच्या साह्याने शेड तयार करुन त्यावर फायबर पत्र्याचे काम करणे, नर्सिंग स्कुलच्या ओपन टू स्काय जागेवर ८ मी. मी. जागेचे पॉलीकारबोनेट Multi Wall डोमचे काम करणे, वस्तीगृह व नर्सिंग स्कुल इमारतीस जोत्याचे संरक्षण कामाअतंर्गत वीटकाम करणे, गिलावा करणे व एम. १० मध्ये आतील बाजूस कॉर्क्रीट करणे या रु.११.०५ लक्ष इतक्या अंदाजपत्रकामध्ये सेंटेज चार्जेस व वस्तुसेवा कराची तरतूद करुन परिगणित

करण्यात आलेल्या रु.१४.०५ लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक व आराखडयास खालील नमूद अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी :-

१. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजुर करूनच काम हाती घ्यावे.
२. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
३. अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी शासनास सादर करावा.
४. तसेच अर्थसंकल्पात निधीची तरतूद केल्याशिवाय सदर बांधकामास सुरूवात करण्यात येऊ नये.

सदर कामावर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्रमांक एच-८

" ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०२- ग्रामीण आरोग्य सेवा,
०४- सार्वजनिक आरोग्य, २०० इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(००)(०१)- प्रमुख्य बांधकामे (४२१००१४१)
५३- मोठी बांधकामे"

सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.६५५/इमा-२, दि.११.०९.२०१७ अन्वये दर्शविलेल्या व वित्त विभागाच्या शा.नि. क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र.१३४ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१९१६०११२९७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.12.20 12:37:16 +05'30'

(रो. दि. कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
४. उपसंचालक, आरोग्य सेवा (लातूर मंडळ), लातूर.
५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे प्रादेशिक विभाग.
६. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर.
९. महालेखापाल,१/२महाराष्ट्र(लेखा व लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१०.वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
११.सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती(आरोग्य-४)